भाईंदर महानगर मुख्य कार्यालय भाईंदर.

२०) प्रस्तावीत इमारतीमध्ये तळमजल्याऐवजी स्टिल्ट (Stilt) प्रस्तावीत केले असल्यास स्टिल्टची उंची मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे ठेवण्यात यावी व या जागेचा वापर वाहनतळासाठीच करण्यात यावा.

२१) मंजुर विकास योजनेत विकास योजना रस्त्याने / रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणारे क्षेत्र -------- चौ.मी. महानगरपालिकेकडे हस्तांतर केले असल्याने व हया हस्तांतर केलेल्या जागेच्या मोबदल्यात आपणांस अतिरिक्त चटई क्षेत्रांचा लाभ/ मंजुरी देण्यात आली असल्याने सदरचे क्षेत्र कायमस्वरुपी खुले, मोकळे, अतिक्रमणविरहीत ठेवण्याची जबाबदारी विकासकाची राहील. तसेच या जागेचा मालकी हक्क इतरांकडे कोणत्याही परिस्थितीत व केव्हाही वर्ग करता येणार नाही. तसेच या क्षेत्राचा इतरांकडून मोबदला आपणांस इतर संबंधितास व धारकास स्विकारता येणार नाही.

२२) मंजूर बांधकाम नकाशातील १५.० मी. पेक्षा जास्त उंचीचे इमारतीचे अग्निशमन व्यवस्थेबाबत सक्षम अधिका-याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे बंधनकारक आहे.

२३) मंजुर रेखांकनाच्या जागेत विद्यमान इमारत तोडण्याचे प्रस्तावीत केले असल्यास विद्यमान बांधकामक्षेत्र महानगरपालिकेकडून प्रमाणीत करुन घेतल्यानंतर विद्यमान इमारत तोडून नवीन बांधकामास प्रारंभ करणे बंधनकारक आहे.

२४) प्रस्तावातील इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे पुर्ण झालेल्या इमारतीस प्रथम वापर परवाना प्राप्त करुन घेणे व तदनंतरच इमारतीचा वापरासाठी वापर करणे अनिवार्य आहे. महानगरपालिकेकडून वापर परवाना न घेता इमारतीचा वापर चालु असल्याचे निदर्शनास आल्यास वास्तुविशारद, विकासक व धारक यांच्यावर व्यक्तीशः कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

२५) पुर्नविकसीत / नव्याने पुर्ण होणा-या इमारतीमध्ये विद्यमान रहिवाशांना सामावून घेण्याची कायदेशीर जबाबदारी वास्तुविशारद, विकासक व धारक यांची राहील. याबाबतची सर्व कायदेशीर पुर्तता (विकासकाने रहिवाशांसोबत करावयाचा करारनामा व इतर बाबी) विकासकाने /धारकाने करणे बंधनकारक राहील.

२६) या मंजुरीची मुदत दि..... पासून दि..... पर्यंत राहील. तदनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार विहित कालावधीसाठी नुतनीकरण करण्यात येईल अन्यथा सदरची मंजुरी कायदेशीररीत्या आपोआप रदद होईल.

२७) सदरच्या आदेशातील नमूद अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदार, वास्तुविशारद, विकासक, अधिकार पत्रधारक, बांधकामपर्यवेक्षक स्ट्रक्चरल अभियंता व धारक यांची राहील.

२८) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.१३/१२/२०१२ रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

मनपा/नर/१२३२/२०१४-१५ दि.१६/०५/२०१४

२९) यापूर्वी पत्र क्र. .....दि..... अन्वये /यासोबतच्या मंजूर रेखांकनात प्रस्तावित केलेल्या इमारतीचे बांधकाम खालीलप्रमाणे मर्यादित ठेवून त्यानुसार कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.

(A) **SALE COMPONENT BUILDING**

अ.क्र.	इमारतीचे नांव/प्रकार	संख्या	तळ + मजले	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र चौ.मी.
१	सी-१	१	बेसमेंट + पार्ट तळ + पोडियम + २२	८०९४.५२
२	सी-२	१	बेसमेंट + पार्ट तळ + पोडियम + २२	८०९४.५२
३	सी-३	१	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + २२	७८४३.५३

(B) **M.M.R.D.A. RENTAL BUILDING**

अ.क्र.	इमारतीचे नांव/प्रकार	संख्या	तळ + मजले	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र चौ.मी.
४	आर-१	१	पार्ट तळ + २३	९५७४.९९
५	आर-२	१	स्टिल्ट + ४ पार्ट	२५९.१८
			जास्तीचे बाल्कनी क्षेत्र	३.०९
एकूण			एकूण बांधकाम क्षेत्र	३३८६९.८३ चौ.मी.

३०) यापुर्वीचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/८८६/२०१३-१४, दि.१०/०६/२०१३ अन्वये देण्यात आलेली मंजुरी रदद करण्यात येत आहे.

३१) जागेवर रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था करणे तसेच अग्निशमन व्यवस्था करणे व अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३२) प्रस्तावित इमारतीसाठी भोगवटा दाखल्यापुर्वी प्रती सदनिका १०० लिटर या क्षमतेची सौर उर्जा वरिल पाणी गरम करण्याची व्यवस्था (सोलार वॉटर हिटिंग सिस्टीम) बसवून कार्यान्वीत करणे व त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३३) भोगवटा दाखल्यापूर्वी वृक्ष प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३४) भोगवटा दाखल्यापूर्वी अग्निशमन विभागाकडील तात्पूरता नाहरकत दाखल्यामधील अटीशर्तींची पूर्तता करुन अंतिम नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३५) जोत्याच्या दाखल्यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३६) जोत्याच्या दाखल्यापूर्वी प्रस्तावित रेखांकनातील दर्शविलेली नागरी सुविधा क्षेत्र ५१९.५३ चौ.मी. जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहिल.

३७) भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने अतिरिक्त सोईसुविधा शुल्कबाबतचे धोरण निश्चित झाल्यास उक्त शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहिल.

महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर

३८) भोडतत्वावरील गृहनिर्माण योजनेबाबत शासनाकडून धोरण बदल / निर्देश असल्यास तसेच पर्यावरण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे निर्देश असल्यास त्याप्रमाणे रेखांकन / बांधकाम नकाशे सुधारीत करणे बंधनकारक राहिल.

३९) इरादापत्र (Location Clearance) मधील अटीशर्तीचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहिल.

४०) M.M.R.D.A. यांचेकडील Location Clearance साठीच्या मुदतवाढीच्या आदेशामधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

४१) सदर जागेच्या रेखांकनामधील Sale Components च्या इमारतीच्या जोत्याच्या दाखल्या नंतर त्यावरील बांधकामासाठीचे स्वतंत्र आदेश प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

४२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६३ अन्वये भोगवटा दाखला घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

४३) इमारत पुर्ण झाल्यानंतर बांधकाम परवानगी मधील नमुद अटी व शर्तीचे पालन केल्याशिवाय बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व भोगवटा दाखला देण्यात येणार नाही. अटींची पुर्तता न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये विकासकावर गुन्हा नोंद करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल

मनपा/नर/१११३२/२०१४-१५

दि. १०/०७/२०१४

आयुक्त 06.06.14

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव

१) प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र. ०६

२) कर निर्धारक व संकलक अधिकारी
कर विभाग

41 C.C.1502 (Legal)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/--१०६---/२०१५-१६ दिनांक :- १०/४/२०१५

प्रति,
अधिकार पत्रधारक - मे. मॅन ग्लोबल लि.
द्वारा - वास्तुविशारद - मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - मिरा सि.स.क्र. १४७५, १५५६ ते १५६१, १५६५ ते १५६७, १६२५, १६४३, १६४४, १७११ ते १७१३, १७१६, १७१७, १७८२, १८७० व स.क्र. ५३/१पै. या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- १) आपला दि.०५/०२/२०१४ रोजीचा अर्ज.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/११३२/२०१४-१५, दि.१७/०७/२०१४ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.
३) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टिए/काशी/एसआर-४२, लिंक केस नं. ३६,३७,३८,३९,४०,४१, दि.२२/०९/८२, यु.एल.सी./टी.ए/टे.नं.१/भाईंदर/एस.आर-१९१, दि.१८/०४/२००६ ची मंजुरी, यु.एल.सी./टिए/मिरा/एसआर-१६, दि.१७/०३/१९८८, यु.एल.सी./टिए/मिरा/एसआर-५०, दि.१३/०५/८२ व यु.एल.सी. विभागाकडील जा.क्र. यु.एल.सी./टिए/मिरा/एसआर-५०, दि.०३/०९/१० व यु.एल.सी. /कक्ष-१/टे-६/मिरे/कावि/१४७/३५/२०१५/७४, दि.१९/०३/१५ अन्वयेचे पत्र.
४) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एनएपी/एसआर-३९/२०११, दि.१३/०५/२०११.
५) दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील पत्र क्र. ईआय/२६६, दि.०४/०१/२०१० अन्वयेचा नाहरकत दाखला.
६) "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" (M.M.R.D.A.) यांचेकडील पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-१२८/१२/५७२, दि.११/१२/२०१२ अन्वये इरादापत्राची मुदतवाढ व पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-१२८/१३/७२, दि.२६/०२/२०१३ अन्वये भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेअंतर्गत रेखांकन मंजूरी तसेच पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-128/14/180, dt.11/06/2014 अन्वयेची मुदतवाढ व पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-128/14/236, dt.04/09/2014 तसेच जा.क्र. MMRDA/RHD/RHS-128/15/47, dt.03/03/2015 अन्वयेचे पत्र.
७) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/२४८/१४-१५, दि.१४/०८/१४ व मनपा/अग्नि/१००/१४-१५, दि.१७/०४/१४ अन्वयेचे तात्पूरते नाहरकत दाखले.
८) पर्यावरण विभागाकडील पत्र क्र. SEAC-2011/CR-79/TC-2, dt.11/06/2014.
९) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/१२६०/२०१४-१५, दि.२२/०७/२०१४ व पत्र क्र. मिभा/मनपा/नर/१२६१/१४-१५, दि.२२/०७/१४ अन्वयेचा जोत्याचा दाखला.
१०) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडील जा.क्र. NHAI/PIU-Surat(Expressway)/Camp-GHB/2014/871, dt.22/08/2014 अन्वयेचे पत्र.
११) विकासकाचे दि.०५/०२/२०१५ व दि.२६/०३/२०१५ अन्वयेचे शपथपत्र.

-: सुधारीत बांधकाम प्रारंभपत्र :- (भूखंड प्रकार अे च्या मर्यादित)
(इमारत प्रकार अे, डी-१, डी-२ व ई साठी फक्त जोत्यापर्यंत)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४४, ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ ते २६९ विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे – मिरा सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. वरीलप्रमाणे या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.
२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

42 C.C.1502 (Legal)

३) मंजूर नकाशाप्रमाणे जागेवर प्रत्यक्ष मोजणी करुन घेणेची आहे व त्यांची तालुका निरिक्षक भूमि अभिलेख ठाणे यांनी प्रमाणीत केलेली नकाशाची प्रत या कार्यालयाच्या अभिलेखार्थ दोन प्रतीमध्ये पाठविणेची आहे व त्यास मंजूरी घेणे आवश्यक आहे.

४) सदर भूखंडाची उपविभागणी महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. तसेच मंजुर रेखांकनातील इमारती विकसीत करण्यासाठी इतर/दुस-या विकासकास अधिकार दिल्यास / विकासासाठी प्रधिकृत केल्यास दुय्यम / दुस-या विकासकाने मंजुर बांधकाम नकाशे व चटई क्षेत्राचे व परवानगीत नमूद अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास/पालन न केल्यास या सर्व कृतीस मुळ विकासक व वास्तुविशारद जबाबदार राहील.

५) या जागेच्या आजुबाजुला जे पुर्वीचे नकाशे मंजुर झाले आहेत त्याचे रस्ते हे सदर नकाशातील रस्त्याशी प्रत्यक्ष मोजणीचे व सिमांकनाचे वेळी सुसंगत जुळणे आवश्यक आहे. तसेच या जागेवरील प्रस्तावीत होणा-या बांधकामास रस्ते संलग्नित ठेवणे व सार्वजनिक वापरासाठी खुले ठेवणेची जबाबदारी विकासक/वास्तुविशारद / धारक यांची राहील. रस्त्याबाबत व वापराबाबत आपली / धारकाची कोणतीही हरकत असणार नाही.

६) नागरी जमीन धारणा कायदा १९७६ चे तरतुदींना व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम च्या तरतुदीस कोणत्याही प्रकारची बाधा येता कामा नये व या दोन्ही कायदयान्वये पारीत झालेल्या व यापुढे वेळोवेळी होणा-या सर्व आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विकासक व वास्तुविशारद इतर धारक यांची राहील.

७) रेखांकनात / बांधकाम नकाशात इमारतीचे समोर दर्शविण्यात / प्रस्तावीत करण्यात आलली सामासीक अंतराची जागा ही सार्वजनिक असून महानगरपालिकेच्या मालकीची राहील व या जागेचा वापर सार्वजनिक रस्त्यासाठी /रस्ता रुंदीकरणासाठी करण्यात येईल. याबाबत अर्जदार व विकासक व इतर धारकांचा कोणताही कायदेशीर हक्क असणार नाही.

८) मालकी हक्काबाबतचा वाद उत्पन्न झाल्यास त्यास अर्जदार, विकासक, वास्तुविशारद, धारक व संबंधीत व्यक्ती जबाबदार राहतील. तसेच वरील जागेस पोच मार्ग उपलब्ध असल्याची व जागेच्या हद्दी जागेवर प्रत्यक्षपणे जुळविण्याची जबाबदारी अर्जदार, विकासक, वास्तुविशारद यांची राहील. यामध्ये तफावत निर्माण झाल्यास सुधारीत मंजुरी घेणे क्रमप्राप्त आहे.

९) मंजुर रेखांकनातील रस्ते, ड्रेनेज, गटारे व खुली जागा (आर.जी.) अर्जदाराने / विकासकाने महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे पुर्ण करुन सुविधा सार्वजनिक वापरासाठी कायम स्वरुपी खुली ठेवणे बंधनकारक राहील.

१०) मंजुर रेखांकनातील इमारतीचे नियमावलीनुसार जोत्याचे प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय उर्वरीत बांधकाम करण्यात येऊ नये.

११) इमारतीस उदवाहन, अग्निशामक तरतुद, पाण्याची जमिनीवरील व इमारतीवरील अशा दोन टाक्या, दोन इलेक्ट्रीक पंपसेटसह तरतुद केलेली असली पाहिजे.

१२) महानगरपालिका आपणांस बांधकामासाठी व पिण्यासाठी व इतर कारणासाठी पाणी पुरवठा करण्याची हमी घेत नाही. याबाबतची सर्व जबाबदारी विकासक/धारक यांची राहील. तसेच सांडपाण्याची सोय व मैलविसर्जनाची व्यवस्था करण्याची जबाबदारी विकासकाची/ धारकाची राहील.

43 C.C.1502 (Legal)

मनपा/नर/१०६/२०१५-१६ दि. १०/४/२०१५

१३) अर्जदाराने स.नं., हि.नं., मौजे, महानगरपालिका मंजूरी, बिल्डरचे नांव, आर्किटेक्टचे नाव, अकृषिक मंजुरी व इतर मंजुरींचा तपशील दर्शविणारा फलक प्रत्यक्ष जागेवर लावण्यात आल्यानंतरच इतर विकास कामास सुरुवात करणे बंधनकारक राहील. तसेच सर्व मंजुरीचे मुळ कागदपत्र तपासणीसाठी/निरीक्षणासाठी जागेवर सर्व कालावधीसाठी उपलब्ध करुन ठेवणे ही वास्तुविशारद व विकासक यांची संयुक्त जबाबदारी आहे. अशी कागदपत्रे जागेवर प्राप्त न झाल्यास तातडीने काम बंद करण्यात येईल.

१४) मंजुर रेखांकनातील इमारतीचे बांधकाम करण्यापुर्वी मातीची चाचणी (Soil Test) घेऊन व बांधकामाची जागा भूकंप प्रवण क्षेत्राचे अनुषंगाने सर्व तांत्रिक बाबी विचारात घेऊन (Specifically earthquake of highest intensity in siesmic zone should be considered) आर.सी.सी. डिझाईन तयार करुन संबंधीत सक्षम अधिका-यांची मंजुरी घेणे. तसेच इमारतीचे आयुष्यमान, वापर, बांधकाम चालू साहित्याचा दर्जा व गुणवत्ता व अग्नि क्षमण व्यवस्था याबाबत नॅशनल बिल्डींग कोड प्रमाणे तरतुदी करुन कार्यान्वीत करणे तसेच बांधकाम चालु असतांना तांत्रिक व अंतांत्रिक कार्यवाही पुर्ण करुन त्याची पालन करण्याची जबाबदारी अर्जदार, विकासक, स्ट्रक्चरल अभियंता, वास्तुविशारद, बांधकाम पर्यवेक्षक, धारक संयुक्तपणे राहील.

१५) रेखांकनातील जागेत विद्यमान झाडे असल्यास तोडण्यासाठी महानगरपालिकेची व इतर विभागांची पुर्व मंजुरी प्राप्त करणे बंधनकारक आहे. तसेच खुल्या जागेत वृक्षारोपण करण्यात यावे.

१६) मंजुर बांधकाम नकाशे व जागेवरील बांधकाम यामध्ये तफावत असल्यास नियमावलीनुसार त्वरीत सुधारीत बांधकाम नकाशांना मंजुरी घेणे बंधनकारक आहे अन्यथा हे बांधकाम मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनधिकृत ठरते त्यानुसार उक्त अनधिकृत बांधकाम तोडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१७) बांधकाम साहित्य रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी ठेवता येणार नाही. याबाबतचे उल्लंघन झाल्यास महानगरपालिकेकडून आपणाविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१८) इमारतीचे बांधकामाबाबत व पुर्णत्वाबाबत नियमावलीतील बाब क्रं. ४३ ते ४६ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची संपुर्ण जबाबदारी विकासक, वास्तुविशारद, स्ट्रक्चरल अभियंता, बांधकाम पर्यवेक्षक व धारक यांची राहिल.

१९) महानगरपालिकेने मंजूर केलेले बांधकाम नकाशे व बांधकाम प्रारंभ पत्र रद्द करण्याची कार्यवाही खालील बाबतीत करण्यात येईल व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार संबंधिताविरुध्द विहीत कार्यवाही करण्यात येईल.

१) मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे बांधकाम न केल्यास.

२) मंजुर बांधकाम नकाशे व प्रारंभ पत्रातील नमुद सर्व अटी व शर्तीचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास.

३) प्रस्तावित जागेचे वापरात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ व इतर अधिनियमान्वये प्रस्तावाखालील जागेच्या वापरात बदल होत असल्यास अथवा वापरात बदल करण्याचे नियोजित केल्यास.

४) महानगरपालिकेकडे सादर केलेल्या प्रस्तावात चुकीची माहिती व विधी ग्राहयता नसलेली कागदपत्रे सादर केल्यास व प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्यास या अधिनियमाचे कलम २५८ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

44 C.C.1502 (Legal)

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर

२०) प्रस्तावीत इमारतीमध्ये तळमजल्यावर स्टिल्ट (Stilt) प्रस्तावीत केले असल्यास स्टिल्टची उंची मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे ठेवण्यात यावी व या जागेचा वापर वाहनतळासाठीच करण्यात यावा.

२१) मंजुर विकास योजनेत विकास योजना रस्त्याने / रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणारे क्षेत्र १४१८.११ चौ.मी. महानगरपालिकेकडे हस्तांतर केले असल्याने सदरचे क्षेत्र कायमस्वरुपी खुले, मोकळे, अतिक्रमणविरहीत ठेवण्याची जबाबदारी विकासकाची राहील. तसेच या जागेचा मालकी हक्क इतरांकडे कोणत्याही परिस्थितीत व केव्हाही वर्ग करता येणार नाही. तसेच या क्षेत्राचा इतरांकडून मोबदला आपणांस इतर संबंधितास व धारकास स्विकारता येणार नाही.

२२) मंजूर बांधकाम नकाशातील १५.० मी. पेक्षा जास्त उंचीचे इमारतीचे अग्निशमन व्यवस्थेबाबत सक्षम अधिका-याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे बंधनकारक आहे.

२३) मंजुर रेखांकनाच्या जागेत विद्यमान इमारत तोडण्याचे प्रस्तावीत केले असल्यास विद्यमान बांधकामक्षेत्र महानगरपालिकेकडून प्रमाणीत करुन घेतल्यानंतर विद्यमान इमारत तोडून नवीन बांधकामास प्रारंभ करणे बंधनकारक आहे.

२४) प्रस्तावातील इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे पुर्ण झालेल्या इमारतीस प्रथम वापर परवाना प्राप्त करुन घेणे व तदनंतरच इमारतीचा वापरासाठी वापर करणे अनिवार्य आहे. महानगरपालिकेकडून वापर परवाना न घेता इमारतीचा वापर चालु असल्याचे निदर्शनास आल्यास वास्तुविशारद, विकासक व धारक यांच्यावर व्यक्तीशः कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

२५) पुर्नविकसीत / नव्याने पुर्ण होणा-या इमारतीमध्ये विद्यमान रहिवाशांना सामावून घेण्याची कायदेशीर जबाबदारी वास्तुविशारद, विकासक व धारक यांची राहील. याबाबतची सर्व कायदेशीर पुर्तता (विकासकाने रहिवाशांसोबत करावयाचा करारनामा व इतर बाबी) विकासकाने /धारकाने करणे बंधनकारक राहील.

२६) या मंजुरीची मुदत दि..... पासून दि..... पर्यंत राहील. तदनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार विहित कालावधीसाठी नुतनीकरण करण्यात येईल अन्यथा सदरची मंजुरी कायदेशीररीत्या आपोआप रदद होईल.

२७) सदरच्या आदेशातील नमूद अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदार, वास्तुविशारद, विकासक अधिकार पत्रधारक, बांधकामपर्यवेक्षक स्ट्रक्चरल अभियंता व धारक यांची राहील.

२८) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.१३/१२/२०१२ रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

45 C.C.1502 (Legal)

मनपा/नर/१०६/२०१५-१६ दि. १०/४/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

२९) यापूर्वी पत्र क्र. .....दि..... अन्वये /यासोबतच्या मंजूर रेखांकनात प्रस्तावित केलेल्या इमारतीचे बांधकाम खालीलप्रमाणे मर्यादित ठेवून त्यानुसार कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.

(A) **SALE COMPONENT BUILDING**

अ.क्र.	इमारतीचे नांव/प्रकार	संख्या	तळ + मजले	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र चौ.मी.
	भूखंड अे			
१	अे	१	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + २१	६७९६.२१
२	डी-१	१	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + १८	२३१३.७२
३	डी-२	१	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + २१	२५५३.८१
४	ई	१	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + २१	१५४९.३२
			जास्तीचे बाल्कनी क्षेत्र	४७.४२
				१३२६०.४८ चौ.मी.
			यापूर्वीच्या मंजूरीप्रमाणेचे इमारत प्रकार सी-१ व सी-२ चे मंजूर बांधकाम क्षेत्र (८०९५.५७ + ८०९५.५७)	१६१९१.१४ चौ.मी.
			एकूण	२९४५१.६२ चौ.मी.

(B) **M.M.R.D.A. RENTAL BUILDING**

अ.क्र.	इमारतीचे नांव/प्रकार	संख्या	तळ + मजले	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र चौ.मी.
४	आर-१	१	पार्ट तळ + २३	९५७४.९९
५	आर-२	१	स्टिल्ट + ४ पार्ट	२५९.१८
				९८३४.१७ चौ.मी.
एकूण			एकूण बांधकाम क्षेत्र	३९२८५.७९ चौ.मी.

३०) यापुर्वीचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/११३२/२०१४-१५, दि.१७/०७/२०१४ अन्वये (सी-१, सी-२ व सी-३ च्या मर्यादित) देण्यात आलेली मंजुरी रदद करण्यात येत आहे.

३१) जागेवर रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था करणे तसेच अग्निशमन व्यवस्था करणे व अग्निशमन विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३२) प्रस्तावित इमारतीसाठी भोगवटा दाखल्यापुर्वी प्रती सदनिका १०० लिटर या क्षमतेची सौर उर्जा वरिल पाणी गरम करण्याची व्यवस्था (सोलार वॉटर हिटिंग सिस्टीम) बसवून कार्यान्वीत करणे व त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३३) भोगवटा दाखल्यापूर्वी वृक्ष प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३४) भोगवटा दाखल्यापूर्वी अग्निशमन विभागाकडील तात्पूरता नाहरकत दाखल्यामधील अटीशर्तींची पूर्तता करुन अंतिम नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

३५) प्रस्तावित रेखांकनातील दर्शविलेली नागरी सुविधा क्षेत्र ९९१.९३ चौ.मी. जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे व या क्षेत्राची महसूल अभिलेखी नोंद मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नावे झालेबाबतचे ७/१२ उतारे व मालमत्ता पत्रक सादर करणे बंधनकारक राहिल.

३६) भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने अतिरिक्त सोईसुविधा शुल्कबाबतचे धोरण निश्चित झाल्यास उक्त शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहिल.

३७) भोडतत्वावरील गृहनिर्माण योजनेबाबत शासनाकडून धोरण बदल / निर्देश असल्यास तसेच पर्यावरण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे निर्देश असल्यास त्याप्रमाणे रेखांकन / बांधकाम नकाशे सुधारीत करणे बंधनकारक राहिल.

३८) इरादापत्र (Location Clearance) मधील अटीशर्तीचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३९) M.M.R.D.A. यांचेकडील Location Clearance साठीच्या मुदतवाढीच्या आदेशामधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

४०) सदर जागेच्या रेखांकनामधील Sale Components च्या इमारतीच्या जोत्याच्या दाखल्या नंतर त्यावरील बांधकामासाठीचे स्वतंत्र आदेश प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

४१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६३ अन्वये भोगवटा दाखला घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

४२) इमारत पुर्ण झाल्यानंतर बांधकाम परवानगी मधील नमुद अटी व शर्तीचे पालन केल्याशिवाय बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व भोगवटा दाखला देण्यात येणार नाही. अटींची पुर्तता न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये विकासकावर गुन्हा नोंद करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

४३) आपण सादर केलेल्या दि.०५/०२/२०१५ व दि.२६/०३/२०१५ रोजीच्या हमीपत्राचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहिल.

४४) पोहोंच रस्त्याखालील जागा संपूर्ण रुंदीमध्ये पक्क्या स्वरुपामध्ये विकसीत करुन सार्वजनिक वापरासाठी निरंतरपणे खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

४५) सदरच्या जागेच्या मालकीहक्काबाबत, भूखंडाच्या हद्दीबाबत तसेच भूखंडाच्या क्षेत्राबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी विकासकाची राहणार असून याबाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

४६) प्रस्तावित इमारतीच्या स्टिल्ट व पोडियम मजल्यामधील अग्निशमन विभागाची गाडी जाणेयेणेसाठीची मार्गिका निरंतरपणे रहदारीसाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

मनपा/नर/ १०६ /२०१५-१६ दि. १०/२/२०१५

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
१) प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र. ०६
२) कर निर्धारक व संकलक अधिकारी
कर विभाग

C.C. (Legal) 1812

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - 401 101

जा.क्र. मिभा / मनपा / नर /५५६२/२०१५-१६ दिनांक - २६/१२/२०१५

प्रति,

अधिकार पत्रधारक - मे. मॅन ग्लोबल लि.

द्वारा - वास्तुविशारद - मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो.

विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - मिरा सि.स.क्र. 1475, 1556 ते 1561, 1565 ते 1567, 1625, 1643, 1644, 1711 ते 1713, 1716, 1717, 1782, 1870 व स.क्र. 53/1पै. या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ : 1) आपला दि.28/09/2018 रोजीचा अर्ज.

2) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टिए/काशी/एसआर- 42, लिंक केस नं. 36,37,38,39,40,41, दि.22/09/82, यु.एल.सी./टी.ए/टे.नं.1/भाईंदर/एस.आर-191, दि.18/04/2006 ची मंजुरी, यु.एल.सी./टिए/मिरा/एसआर-16, दि.17/03/1988, यु.एल.सी./टिए /मिरा/एसआर-50, दि.13/05/82 व यु.एल.सी. विभागाकडील जा.क्र.यु.एल. सी./टिए/मिरा/एसआर-50, दि.03/09/10 व यु.एल.सी./कक्ष-1/टे-6/मिरे/ कावि/147/35/2015/74, दि.19/03/15 अन्वयेचे पत्र.

3) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. महसूल/क-1/टे-1/एनएपी/एसआर-39/2011, दि.13/05/2011.

4) दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील पत्र क्र. ईआय/266, दि.04/01/2010 अन्वयेचा नाहरकत दाखला.

5) "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" (MMRDA) यांचेकडील पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-128/12/572, दि.11/12/2012 अन्वये इरादापत्राची मुदतवाढ व पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-128/13/72, दि.26/02/2013 अन्वये भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेअंतर्गत रेखांकन मंजूरी तसेच पत्र क्र. MMRDA/RHD/RHS- 128/14/180,दि.11/06/2014 अन्वयेची मुदतवाढ व पत्र क्र. MMRDA/RHD/RHS-128/14/236, दि.04/09/2014 तसेच जा.क्र. MMRDA/RHD/RHS-128/15/47, दि.03/03/2015 अन्वयेचे पत्र.

6) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/248/14-15, दि.06/02/18 व मनपा/अग्नि/100/14-15, दि.17/04/14 अन्वयेचे तात्पूरते नाहरकत दाखले.

7) पर्यावरण विभागाकडील पत्र क्र. SEAC-2011/CR-79/TC-2, दि.11/06/2014.

8) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडील जा.क्र. NHAI/PIU-Surat(Expressway)Camp-GHB/2014/871, दि.22/08/2014 अन्वयेचे पत्र.

9) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/106/2015-16, दि.10/04/2015 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.

C.C. (Legal) 1812

-: सुधारीत बांधकाम प्रारंभपत्र :- (सुधारीत नकाशे मंजूरीसह)

(इमारत प्रकार अे, सी-1, सी-2, डी-1, डी-2, ई, आर-1, आर-2 च्या मर्यादित)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 44, 45 अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 253 ते 269 विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - मिरा, सि.स.क्र. 1475, 1556 ते 1561, 1565 ते 1567, 1625, 1643, 1644, 1711 ते 1713, 1716, 1717, 1782, 1870 व स.क्र. 53/1पै. या जागेतील मु.म.प्र.वि.प्राधिकरणाकडील दि.21/07/2017 अन्वयेच्या सुधारीत लोकेशन क्लिअरन्सनुसार अनुज्ञेय होणा-या वाढीव 257.28 चौ.मी. क्षेत्रासाठी रेन्टल कम्पोनेंटमध्ये इमारत प्रकार R-2 व सेल कम्पोनेंटमधील इमारत प्रकार अे, डी-1, डी-2, ई, सी-1 व सी-2 मध्ये सुधारीत बांधकाम नकाशे प्रस्तावित करुन खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

1) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.

2) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

3) मंजूर नकाशाप्रमाणे जागेवर प्रत्यक्ष मोजणी करुन घेणेची आहे व त्याची तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांनी प्रमाणीत केलेली नकाशाची प्रत या कार्यालयाच्या अभिलेखार्थ दोन प्रतीमध्ये पाठविणेची आहे व त्यास मंजूरी घेणे आवश्यक आहे.

4) सदर भूखंडाची उपविभागणी महानगरपालिकेच्या पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही. तसेच मंजूर रेखांकनातील इमारती विकसीत करण्यासाठी इतर / दुस-या विकासकास अधिकार दिल्यास / विकासासाठी प्राधिकृत केल्यास दुय्यम / दुस-या विकासकाने मंजूर बांधकाम नकाशे व चटईक्षेत्राचे व परवानगीत नमुद अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास / पालन न केल्यास या सर्व कृतीस मुळ विकासक व वास्तुविशारद जबाबदार राहील.

5) या जागेच्या आजुबाजुला जे पुर्वीचे नकाशे मंजूर झाले आहेत त्याचे रस्ते हे सदर नकाशातील रस्त्याशी प्रत्यक्ष मोजणीचे व सिमांकनाचे वेळी सुसंगत जुळणे आवश्यक आहे. तसेच या जागेवरील प्रस्तावीत होणा-या बांधकामास रस्ते संलग्नित ठेवणे व सार्वजनिक वापरासाठी खुले ठेवणेची जबाबदारी विकासक / वास्तुविशारद / धारक यांची राहील. रस्त्याबाबत व वापराबाबत आपली / धारकांची कोणताही हरकत असणार नाही.

6) नागरी जमीन धारणा कायदा 1976 चे तरतुदींना व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या तरतुदीस कोणत्याही प्रकारची बाधा येता कामा नये व या दोन्ही कायद्यान्वये पारित झालेल्या व यापुढे वेळोवेळी होणा-या सर्व आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विकासक व वास्तुविशारद इतर धारक यांची राहील.

7) रेखांकनात / बांधकाम नकाशात इमारतीचे समोर दर्शविण्यात / प्रस्तावित करण्यात आलेली सामासिक अंतराची जागा ही सार्वजनिक असून महानगरपालिकेच्या मालकीची राहील व या जागेचा वापर सार्वजनिक रस्त्यासाठी / रस्ता रुंदीकरणासाठी करण्यात येईल. याबाबत अर्जदार व विकासक व इतर धारकांचा कोणताही कायदेशीर हक्क असणार नाही.

8) मालकीहक्काबाबतचा वाद उत्पन्न झाल्यास त्यास अर्जदार, विकासक, वास्तुविशारद, धारक व संबंधीत व्यक्ती जबाबदार राहतील. तसेच वरील जागेस पोंच मार्ग उपलब्ध असल्याची व जागेच्या हद्दी जागेवर प्रत्यक्षपणे जुळविण्याची जबाबदारी अर्जदार, विकासक, वास्तुविशारद यांची राहील. यामध्ये तफावत निर्माण झाल्या झाल्यास सुधारीत मंजूरी घेणे क्रमप्राप्त आहे.

9) मंजूर रेखांकनातील रस्ते, ड्रेनेज, गटारे व खुली जागा (आर.जी.) अर्जदाराने / विकासकाने महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे पूर्ण करुन सुविधा सार्वजनिक वापरासाठी कायम स्वरुपी खुली ठेवणे बंधनकारक राहील.

10) मंजूर रेखांकनातील इमारतीचे नियमावलीनुसार जोत्याचे प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय उर्वरीत बांधकाम करण्यात येऊ नये.

11) इमारतीचे उद्वाहन, अग्निशमन तरतुद, पाण्याची जमिनीवरीसल व इमारतीवरील अशा दोन टाक्या, दोन इलेक्ट्रीक पंपसेटसह तरतूद केलेली असली पाहिजे.

12) महानगरपालिका आपणास बांधकामासाठी व पिण्यासाठी व इतर कारणासाठी पाणीपुरवठा करण्याची हमी घेत नाही. याबाबतची सर्व जबाबदारी विकासक / धारक यांची राहील. तसेच सांडपाण्याची सोय व मलविसर्जनाची व्यवस्था करण्याची जबाबदारी विकासकाची / धारकाची राहील. तसेच बांधकाम सुरु करतेवेळी बांधकाम संपेपर्यंत तेथील बांधकाम कामगारांसाठी आवश्यकतेप्रमाणे पुरेशा शौचालयाची व पाळणाघराची व्यवस्था करणे आपणावर बंधनकारक राहिल.

13) अर्जदाराने स.क्र. / हि.क्र. मौजे, महानगरपालिका मंजूरी, बिल्डरचे नाव, आर्किटेक्टचे नाव, अकृषिक मंजूरी व इतर मंजूरीचा तपशील दर्शविणारा फलक प्रत्यक्ष जागेवर लावण्यात आल्यानंतरच इतर विकास कामास सुरुवात करणे बंधनकारक राहील. तसेच सर्व मंजूरीचे मुळ कागदपत्र तपासणीसाठी / निरीक्षणासाठी जागेवर सर्व कालावधीसाठी उपलब्ध करुन ठेवणे ही वास्तुविशारद व विकासक यांची संयुक्त जबाबदारी आहे. अशी कागदपत्रे जागेवर प्राप्त न झाल्यास तातडीने काम बंद करण्यात येईल.

14) मंजूर रेखांकनातील इमारतीचे बांधकाम करण्यापुर्वी मातीची चाचणी (Soil Test) घेऊन व बांधकामाची जागा भूकंप प्रवण क्षेत्राचे अनुषंगाने सर्व तांत्रिक बाबी विचारात घेऊन (Specifically earthquake of highest intensity in seismic zone should be considered) आर.सी.सी. डिझाईन तयार करुन संबंधीत सक्षम अधिकायांची मंजूरी घेणे. तसेच इमारतीचे आयुष्यमान, वापर, बांधकाम चालू साहित्याचा दर्जा व गुणवत्ता व अग्नि क्षमण व्यवस्था याबाबत नॅशनल बिल्डींग कोड प्रमाणे तरतुदी करुन कार्यान्वीत करणे तसेच बांधकाम चालू असतांना तांत्रिक व अतांत्रिक कार्यवाही पूर्ण करुन त्याची पालन करण्याची जबाबदारी अर्जदार, विकासक, स्ट्रक्चरल अभियंता, वास्तुविशारद, बांधकाम पर्यवेक्षक, धारक संयुक्तपणे राहील.

15) रेखांकनातील जागेत विद्यमान झाडे असल्यास तोडण्यासाठी महानगरपालिकेची व इतर विभागांची पूर्व मंजूरी प्राप्त करणे बंधनकारक आहे. तसेच खुल्या जागेत वृक्षारोपण करण्यात यावे.

16) मंजूर बांधकाम नकाशे व जागेवरील बांधकाम यामध्ये तफावत असल्यास नियमावलीनुसार त्वरीत सुधारीत बांधकाम नकाशांना मंजूरी घेणे बंधनकारक आहे अन्यथा हे बांधकाम मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनाधिकृत ठरते त्यानुसार उक्त अनाधिकृत बांधकाम तोडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

17) बांधकाम साहित्य रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी ठेवता येणार नाही. याबाबतचे उल्लंघन झाल्यास महानगरपालिकेकडून आपणाविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

18) इमारतीचे बांधकामाबाबत व पुर्णत्वाबाबत नियमावलीतील बाब क्र. 43 ते 46 ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची संपुर्ण जबाबदारी विकासक, वास्तुविशारद, स्ट्रक्चरल अभियंता, बांधकाम पर्यवेक्षक व धारक यांची राहिल.

C.C. (Legal) 1812

19) महानगरपालिकेने मंजूर केलेले बांधकाम नकाशे व बांधकाम प्रारंभपत्र रद्द करण्याची कार्यवाही खालील बाबतीत करण्यात येईल व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतूदीनुसार संबंधिताविरुध्द विहीत कार्यवाही करण्यात येईल.

1) मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे बांधकाम न केल्यास.

2) मंजूर बांधकाम नकाशे व प्रारंभपत्रातील नमुद सर्व अटी व शर्तीचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास.

3) प्रस्तावित जागेचे वापरात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 व इतर अधिनियमान्वये प्रस्तावाखालील जागेच्या वापरात बदल होत असल्यास अथवा वापरात बदल करण्याचे नियोजित केल्यास.

4) महानगरपालिकेकडे सादर केलेल्या प्रस्तावात चुकीची माहिती व विधी ग्राह्यता नसलेली कागदपत्रे सादर केल्यास व प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्यास या अधिनियमाचे कलम २५८ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

20) प्रस्तावित इमारतीमध्ये तळ मजल्यावर स्टिल्ट (Stilt) प्रस्तावित केले असल्यास स्टिल्टची उंची मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे ठेवण्यात यावी व या जागेचा वापर वाहनतळासाठीच करण्यात यावा.

21) मंजूर विकास योजनेत विकास योजना रस्त्याने / रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणारे क्षेत्र 511.89 चौ.मी. महानगरपालिकेकडे हस्तांतर केले असल्याने व ह्या हस्तांतर केलेल्या जागेच्या मोबदल्यात आपणास अतिरिक्त चटईक्षेत्रांचा लाभ / मंजूरी देण्यात आली असल्याने सदरचे क्षेत्र कायमस्वरुपाची खुले, मोकळे, अतिक्रमणविरहीत ठेवण्याची जबाबदारी विकासकाची राहील. तसेच या जागेचा मालकीहक्क इतरांकडे केणत्याही परिस्थितीत व केव्हाही वर्ग करता येणार नाही. तसेच या क्षेत्राचा इरतांकडून मोबदला आपणास इतर संबंधितास व धारकास स्विकारता येणार नाही.

22) मंजूर बांधकाम नकाशातील 15.00 मी. पेक्षा जास्त उंचीचे इमारतीचे अग्निशमन व्यवस्थेबाबत सक्षम अधिका-याचे ' नाहरकत प्रमाणपत्र ' सादर करणे बंधनकारक आहे.

23) मंजूर रेखांकनाच्या जागेत विद्यमान इमारत तोडण्याचे प्रस्तावित केले असल्यास विद्यमान बांधकाम क्षेत्र महानगरपालिकेकडून प्रमाणीत करुन घेतल्यानंतर विद्यमान इमारत तोडून नविन बांधकामास प्रारंभ करणे बंधनकारक आहे.

24) प्रस्तावातील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे पूर्ण झालेल्या इमारतीस प्रथम वापर परवाना प्राप्त करुन घेणे व तद्नंतरच इमारतीचा वापरासाठी वापर करणे अनिवार्य आहे. महानगरपालिकेकडून वापर परवाना न घेता इमारतीचा वापर चालू असल्याचे निदर्शनास आल्यास वास्तुविशारद, विकासक व धारक यांच्यावर व्यक्तिशः कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

25) या मंजूरीची मुदत एक वर्षापर्यंत राहील. तद्नंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे तरतूदीनुसार विहीत कालावधीसाठी नुतनीकरण करण्यात येईल अन्यथा सदरची मंजूरी कायदेशीररित्या आपोआप रद्द होईल.

26) सदरच्या आदेशातील अटी व शर्तीचे पालन करणेची जबाबदारी अधिकारपत्रधारक, बांधकाम पर्यवेक्षक, वास्तुविशारद, स्ट्रक्चरल अभियंता व धारक यांची राहील.

27) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबित नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.13/12/2012 रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

28) सदर जागेच्या मालकीहक्काबाबत जागेच्या हद्दीबाबत मा. न्यायालयीन दाव्याबाबत व पोहोंच रस्त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी विकासकांची राहणार असून त्याबाबत महानगपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच याबाबत कोणत्याही प्रकारची विसंगती आढळल्यास सदर परवानगी रद्द समजणेत येईल.

C.C. (Legal) 1812 जा.क्र. मनपा/नर/५५६२/२०१८-१९ दि.२६/१२/२०१८

29) यापूर्वी पत्र क्र. _____ दि._____ अन्वये यासोबतच्या मंजूर रेखांकनात प्रस्तावित केलेल्या इमारतीचे बांधकाम खालीलप्रमाणे मर्यादीत ठेवून त्यानुसार कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.

SALE COMPONENT BUILDINGS

अ.क्र.	इमारतीचे नांव / प्रकार	संख्या	तळ + मजले	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.)
1	अे	1	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + 21	6907.32
2	सी-1	1	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + 22	8108.01
3	सी-2	1	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + 22	8096.68
4	डी-1	1	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + 22 पार्ट	2824.81
5	डी-2	1	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + 22	2672.78
6	ई	1	बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + 22	1641.53
			एकूण बांधकाम क्षेत्र	30251.13 चौ.मी.

MMRDA RENTAL BUILDINGS

अ.क्र.	इमारतीचे नांव / प्रकार	संख्या	तळ + मजले	प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.)
1	आर-1	1	स्टिल्ट + 23	9574.27
2	आर-2	1	स्टिल्ट + 4 पार्ट	502.05
			एकूण बांधकाम क्षेत्र	10076.32 चौ.मी.

30) यापूर्वी पत्र क्र. मनपा/नर/106/2015-16, दि.10/04/2015 अन्वये देण्यात आलेली मंजूरी (इमारत प्रकार अे, सी-1, सी-2, डी-1, डी-2, ई, आर-1, आर-2 च्या मर्यादित) रद्द करण्यात येत आहे.

31) जागेवर रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था करणे तसेच त्याबाबतची यंत्रणा स्वतंत्र ओव्हरटँक व प्लंबींग लाईनसह कार्यान्वीत ठेवणे व त्याबाबत पाणीपुरवठा विभागाकडील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

32) प्रस्तावित इमारतीसाठी भोगवटा दाखल्यापूर्वी प्रती सदनिका 100 लिटर या क्षमतेची सौर उर्जा वरिल पाणी गरम करण्याची व्यवस्था (सोलार वॉटर हिटींग सिस्टीम) बसवून कार्यान्वीत करणे व त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

33) भोगवटा दाखल्यापुर्वी सदर वृक्ष प्राधिकरणाच्या सल्ल्याप्रमाणे भूखंडामध्ये प्रती 100 चौ.मी. करिता दोन झाडे याप्रमाणे तसेच आर.जी. च्या भूखंडामध्ये प्रती 100 चौ.मी. करिता पाच झाडांची लागवड करुन त्याबाबत वृक्ष प्राधिकरण विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

34) भोगवटा दाखल्यापूर्वी अग्निशमन विभागाकडील तात्पूरता नाहरकत दाखल्यामधील अटीशर्तींची पूर्तता करुन अंतिम नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहिल.

35) मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगीच्या आदेशामधील अटीशर्तींची पूर्तता करणे आपणावर बंधनकारक राहिल.

C.C. (Legal) 1812

36) भोगवटा दाखल्यापूर्वी विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचा नोंदणीकृत करारनाम्यासह मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावेचा निर्विवाद 7/12 उतारा सादर करणे बंधनकारक राहिल.

37) प्रस्तावित रेखांकनातील दर्शविलेली नागरी सुविधा क्षेत्र 530.74 चौ.मी. जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे व या क्षेत्राची महसूल अभिलेखी नोंद मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नावे झालेबाबतचे 7/12 उतारे व मालमत्ता पत्रक सादर करणे बंधनकारक राहिल.

38) भाडेतत्वावरील गृहनिर्माण योजनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने अतिरिक्त सोईसुविधा शुल्कबाबतचे धोरण निश्चित झाल्यास उक्त शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहिल.

39) भोडतत्वावरील गृहनिर्माण योजनेबाबत शासनाकडून धोरण बदल / निर्देश असल्यास तसेच पर्यावरण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे निर्देश असल्यास त्याप्रमाणे रेखांकन / बांधकाम नकाशे सुधारीत करणे बंधनकारक राहिल.

40) पर्यावरण विभागाकडील पत्र क्र. SEAC-2011/CR-79/TC-2, दि.11/06/2014 च्या पत्रातील अटी व शर्तींचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

41) इरादापत्र (Location Clearance) मधील अटीशर्तीचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

42) MMRDA यांचेकडील Location Clearance चे मुदतवाढ मंजूरीचे पत्र 10 दिवसात सादर करणे आपणांवर बंधनकारक राहिल

43) MMRDA यांचेकडील Location Clearance च्या मुदतवाढीमधील अटी व शर्तींचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

44) पोहोंच रस्त्याखालील जागा संपूर्ण रुंदीमध्ये पक्क्या स्वरुपामध्ये विकसीत करुन सार्वजनिक वापरासाठी निरंतरपणे खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

45) शासन निर्देश क्र. TPS-1816/CR-443/16/RP Directives/UD-13, dt.13/04/2017 मधील अटीशर्तींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

46) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 263 अन्वये भोगवटा दाखला घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

47) सदरच्या जागेवर बांधकामासाठी 200 पेक्षा जास्त बांधकाम कामगार असल्यास काम करणा-या बांधकाम कामगारांसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेमार्फत राबविण्यात येणा-या योजना, त्यासाठीचे अर्ज, त्यासंबंधी इतर आवश्यक माहिती तसेच पात्र बांधकाम कामगारांची नोंदणी करिता आवश्यक प्रक्रिया नोंदणी, नुतनीकरण, बांधकाम कामगारांचे बँक खाते उघडणे इत्यादी सर्व प्रकारची संबंधित कामे करणेसाठी Facilitation Centre उभारणे बंधनकारक राहिल.

48) इमारत पूर्ण झाल्यानंतर बांधकाम परवानगी मधील नमुद अटी व शर्तींचे पालन केल्याशिवाय बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व भोगवटा दाखला देण्यात येणार नाही. अटींची पूर्तता न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये विकासकावर गुन्हा नोंद करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

49) सदर जागेमध्ये इमारतीचे बांधकाम सुरु करतांना बांधकामाच्या अनुषंगीक कामामुळे सभोवतालच्या इमारतींना / बांधकामांना / रहिवाश्यांना त्रास होणार नाही किंवा जिवीत वा वित्त हानी होणार नाही याची खबरदारी घेणेची सर्वस्वी जबाबदारी विकासक / वास्तुविशारद, स्ट्रक्चरल इंजिनिअर / साईट सुपरव्हाईजर यांची राहणार असून त्यासाठी महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

C.C. (Legal) 1812

50) सदर गृहसंकुलातील रहिवाश्यांसाठी 2 टन क्षमतेच्या जैविक खत निर्मीती प्रकल्प उभारून कार्यान्वीत करणे आपणावर बंधनकारक राहील.

51) शासनास हस्तांतरीत करावयाच्या सदनिका शासनास हस्तांतरीत करुन त्याबाबतच्या नाहरकत दाखल्यासह शासनाच्या इतर विभागाकडील आवश्यक नाहरकत दाखले / परवानग्या प्राप्त करुन घेणेची सर्वस्वी जबाबदारी विकासक व वास्तुविशारद यांची राहिल.

52) सदर जागेमध्ये माती भरणी किंवा खोदकाम करणेसाठी संबंधित महसूल प्राधिकरणाकडून परवानगी घेणे व त्याअनुषंगीक आवश्यक शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहिल.

53) मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतूदीप्रमाणे आवश्यक वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहिल.

54) सदर जागेबाबत शासन निर्देशाप्रमाणे आवश्यक असणा-या परवानग्या / नाहरकत दाखले प्राप्त करुन घेणेची जबाबदारी विकासकाची राहिल.

55) मोकळ्या जागेच्या कराचा भरणा प्रत्येक वर्षाच्या आर्थिक वर्षामध्ये भोगवटा दाखला प्राप्त दिनांकापर्यंत भरणा करणे आपणावर बंधनकारक राहिल. कराचा भरणा न केल्यास आपणावर पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

56) भोगवटा दाखल्यापुर्वी शासन अधिसुचना क्र. टिपीएस-1218/2710/प्र.क्र.117/18, नवि-12, दि.06/10/2018 प्रमाणे सदर जागेमध्ये आवश्यक क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया व पुर्नवापरासाठीचा प्रकल्प उभारुन कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.

जा.क्र. मनपा / नर / ५५६२ / २०१८-१९ दि. २६/१२/२०१८

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
21/8/18

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव

१) विभाग प्रमुख
अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

२) कर निर्धारक व संकलक अधिकारी
कर विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/ ५५४/२०१९ - २० दिनांक:-०७/०५/२०१९

Bhd. (Legal) 1903

// भाग भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. मन ग्लोबल लि. (विकासक)
101, मॅन हाऊस, एस.व्हि.रोड, पवनहंस समोर, विलेपार्ले (प.), मुंबई 57.

2) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो., (वास्तुविशारद)
101, वेस्ट व्हयु, अे-2, सेक्टर -II, शांती नगर, मिरारोड (पूर्व)

विषय - मौजे मिरा, सि.स.क्र. 1475, 1556 ते 1561, 1565 ते 1567, 1625, 1643, 1644, 1711 ते 1713, 1716, 1717, 1782, 1870 व स.क्र. 53/1पै. या जागेतील सेल कम्पोनेट मधील नियोजित इमारत प्रकार अे, सी-1, सी-2 व रेन्टर कम्पोनेंट मधिल नियोजित इमारत प्रकार आर-1, आर-2 या इमारतीस भोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ - 1) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो. (वास्तुविशारद) यांचा दि.12/03/19 व दि.20/04/2019 रोजीचा अर्ज.

2) मे. सक्षम अधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील यु.एल.सी./टिए/काशी/एसआर-42 - लिक केस नं.36,37,38,39,40,41 दि.22/09/82, यु.एल.सी./टिए/ टे.नं.1/ भाईंदर/एनआर-191, दि.18/04/2006 ची मंजुरी, यु.एल.सी./टिए/मिरा/एसआर-16 दि.17/03/1988, यु.एल.सी/टिए/मिरा/एसआर- 50 दि.13/05/82, यु.एल.सी./ टिए / मिरा/ एसआर- 50 दि.03/09/10 व यु.एल.सी./कक्ष-1/टे-6/मिरा/काचि/ 147/ 35/ 2015/74 दि.19/03/15 अन्वयेचे पत्र सादर केलेले आहे. तसेच नाजकधा अधिनियम 1976 अन्वये कलम 10(3), 10(5) खालील कार्यवाही झाली नसलेबाबत दि.02/07/2018 रोजीचे शपथपत्र व बंधपत्र सादर.

3) मा. जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाचे पत्र क्र. महसूल/क्र.1/टे-1/एनएपी/एसआर-39/2011 दि.13/05/2011 अन्वयेचे अकृषिक आदेश.

4) महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/5562/18-19 दि.26/12/2018 रोजीची सुधारीत बांधकाम परवानगी

5) महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/1260/14-15 दि.22/07/2014, पत्र क्र. मनपा/नर/ 1261/ 14-15 दि. 22/07/2017 व पत्र क्र. मनपा/नर/3592/15-16 दि.05/12/2015 अन्वये जोत्याचा दाखला.

6) MMRDA. यांचे कडील दि.29/10/11 रोजीचे लोकेशन क्लिअरंस, दि.11/12/12 रोजीची मुदतवाढ, दि.26/02/13 रोजीची मंजूरी, दि.11/06/14 रोजीची मुदतवाढ, दि.04/09/14 व दि.03/03/15 अन्वयेचे FSI Released बाबतचे पत्र व दि.21/07/17 रोजीचे सुधारीत लोकेशन क्लिअरंसच्या MMRDA/RHD/RHS-128(11)/53/2019 दि.15/04/2019 रोजीचे नाहरकत पत्र,

7) दि इस्ट इन्व्हेसमेंट कं.प्रा.लि., यांचेकडील पत्र क्र. EI/266 of. 04/01/2010 अन्वयेचा नाहरकत दाखला.

8) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो (वास्तुविशारद) यांनी (Building Completion Certificate) दि.12/03/2019 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

9) मे. राजे स्ट्रक्चरल व कन्सल्टंट यांचेकडील दि.12/08/2018 व दि.20/04/2019 रोजी इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा दाखला.

10) श्री. दिलीप शर्मा यांचा दि.27/06/2018 व दि.28/01/2019 रोजीचा प्लबींगबाबतचा दाखला.

11) मिरा भाईंदर महानगरपालिकाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील (इमारत अे, डी- 1, डी- 2 ई) करीता जा.क्र. मनपा/सांबा/12418/2018-19 दि.07/03/2019, (इमारत आर-1, आर-2) करीता जा.क्र. मनपा/सांबा/8933/2018-19 दि.14/12/2019 व (इमारत सी-1, सी-2) करीता जा.क्र. मनपा/सांबा/988/2018-19 दि.08/05/2018 अन्वये सोलार वॉटर हिटींग सिस्टीमचा नाहरकत दाखला.

12) महानगरपालिकाचे रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाची उभारणी केलेबाबतचे पाणीपुरवठा विभागाकडील पत्र क्र. मनपा/पा.पू./910/2018-19 दि.06/09/2018 अन्वयेचे प्रमाणपत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, काशीगाव, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/
Bld. (Legal) 1903

दिनांक:- 07/05/2019

13) महानगरपालिकाचे उद्यान व वृक्षप्राधिकरण यांचेकडील पत्र क्र.. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/155/2018-19 दि.30/05/2018 अन्वये नाहरकत दाखला.

14) विकासकाचे दि. 08/03/2019 व दि. 19/04/2019 रोजीचे शपथपत्र.

महोदय,

विषयांकित जागेमधील **रहिवास + वाणिज्य** वापराच्या (प्रस्तावित इमारतपैकी सेल कम्पोनेट मधिल इमारत प्रकार अे (बेसमेंट + स्टिल्ट + पोडियम + 12 मजले) इमारत सी-1, सी-2 (बेसमेंच + पार्ट तळ + पोडियम + 22 मजले) क्षेत्र = 20151.73 चौ.मी. व रेन्टल कम्पोनन्ट मधील इमारत प्रकार आर-1 (पार्ट तळ + 23 मजले) व इमारत आर-2 (स्टिल्ट + 4 पार्ट मजले) क्षेत्र = 10076.32 चौ.मी. क्षेत्राचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे **वास्तुविशारद मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो., (नोंदणी क्र. सीए/75/1274, दि.23/08/1975 व दि.31/12/2023 पर्यंतची मुदतवाढ)** यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता **मे. राजे स्ट्रक्चरल** व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक **श्री. दिलीप शर्मा** यांनी दाखले दिलेले आहेत. यास्तव सदर **वरीलप्रमाणे** च्या इमारतीसाठी खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन प्रस्तावित इमारतीसाठी भाग भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

अटीशर्ती -

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तीचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 14 अन्वयेच्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

2) जर

अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत

3) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

4) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

5) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

6) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

7) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरु असलेल्या दाव्याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

8) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.12/12/2018 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनिस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

9) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

10) इमारत प्रकार "ई" च्या भोगवटा दाखला पूर्वी नागरी सुविधा क्षेत्राची व विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्राचे मनपाचे नावे नोंद झालेले निर्विवाद मालमत्ता पत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

11) MMRDA यांचेकडील मंजुरी / नाहरकत दाखल्यामधील अटीशर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

12) पर्यावरण विभागाकडील दि.11/06/2014 रोजीच्या पत्रातील अटीशर्तींचे पालन करणे, मुदतवाढ सादर करणे बंधनकारक राहील.

13) रेखांकनामधील वाहनतळाची जागा व आर.जी. ची जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
7/5/19.

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक

2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/ 339६१२०१९ - २०

Bhd. (Legal) 1908

दिनांक:- 23/०४/२०१९

// भाग भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. मन ग्लोबल लि. (विकासक)
101, मॅन हाऊस, एस.व्हि.रोड, पवनहंस समोर, विलेपार्ले (प.), मुंबई 57.

2) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो., (वास्तुविशारद)
101, वेस्ट व्ह्यु, अे-2, सेक्टर -II, शांती नगर, मिरारोड (पूर्व)

विषय - मौजे मिरा, सि.स.क्र. 1475, 1556 ते 1561, 1565 ते 1567, 1625, 1643, 1644, 1711 ते 1713, 1716, 1717, 1782, 1870 व स.क्र. 53/1पै. या जागेतील सेल कम्पोनेट मधील सी-2 व रेन्टर कम्पोनेंट मधिल नियोजित इमारत प्रकार अे, डी-1, डी-2 या इमारतीस भाग भोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ - 1) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो. (वास्तुविशारद) यांचा दि.27/08/2019 रोजीचा अर्ज.

2) मे. सक्षम अधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील यु.एल.सी./टिए/काशी/एसआर-42 - लिक केस नं.36,37,38,39,40,41 दि.22/09/82, यु.एल.सी./टिए/ टे.नं.1/ भाईंदर/एसआर-191, दि.18/04/2006 ची मंजुरी, यु.एल.सी./टिए/मिरा/एसआर-16 दि:17/03/1988, यु.एल.सी/टिए/मिरा/एसआर- 50 दि.13/05/82, यु.एल.सी./ टिए / मिरा/ एसआर- 50 दि.03/09/10 व यु.एल.सी./कक्ष-1/टे-6/मिरा/कावि/ 147/ 35/ 2015/74 दि.19/03/15 अन्वयेचे पत्र सादर केलेले आहे. तसेच नाजकधा अधिनियम 1976 अन्वये कलम 10(3), 10(5) खालील कार्यवाही झाली नसलेबाबत दि.08/08/2019 रोजीचे शपथपत्र व बंधपत्र सादर.

3) मा. जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाचे पत्र क्र. महसूल/क्र.1/टे-1/एनएपी/एसआर-39/2011 दि.13/05/2011 अन्वयेचे अकृषिक आदेश.

4) महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/5562/18-19 दि.26/12/2018 रोजीची सुधारीत बांधकाम परवानगी

5) महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/3592/15-16 दि.05/12/2015 अन्वये जोत्याचा दाखला.

6) MMRDA यांचे कडील दि.29/10/11 रोजीचे लोकेशन क्लिअरंस, दि.11/12/12 रोजीची मुदतवाढ, दि.26/02/13 रोजीची मंजूरी, दि.11/06/14 रोजीची मुदतवाढ, दि.04/09/14 व दि.03/03/15 अन्वयेचे FSI Released बाबतचे पत्र व दि.21/07/17 रोजीचे सुधारीत लोकेशन क्लिअरंसच्या MMRDA/RHD/RHS-128(11)/53/2019 दि.15/04/2019 व MMRDA/RHD/RHS-128(II)/122/2019, दि.23/08/2019 रोजीचे नाहरकत पत्र,

